**मे. अंबुजा सिमेंट लि. यांच्या प्रस्तावित नांदगाँव-एकोडी लाईमस्टोन माईन, नांदगाँव, एकोडी, भोयेगाँव व कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर येथे ३६९.५२ हे. क्षेत्रात चुनखडी उत्खनन २.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष व क्रशर १२०० टन प्रति तास उत्पादन क्षमतेच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २९/०१/२०२१ |
| वेळ | : | दुपारी १२.१० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ, मे. अंबुजा सिमेंट लि. नांदगाँव-एकोडी लाईमस्टोन माईन, नांदगाँव, ता. कोरपना, जि. चंद्रपूर |

<u>प्रस्तावना:-</u>

मे. अंबुजा सिमेंट लि. नांदगाँव-एकोडी लाईमस्टोन माईन, नांदगाँव, एकोडी, भोयेगाँव व कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर येथे ३६९.५२ हे. क्षेत्रात चुनखडी उत्खनन २.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष व क्रशर १२०० टन प्रति तास उत्पादन क्षमतेच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केल्यानंतर पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (EAC) यांनी त्यांच्या दि. ०४/०७/२०१८ रोजी सदर प्रस्तावीत प्रकल्पास प्राथमिक पत्र (TOR) जारी केले (सहपत्र-१) व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने दि. २९/०१/२०२१ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि. २२/१२/२०२० रोजीच्या मराठी दैनिक "लोकसत्ता" व इंग्रजी दैनिक "द टाईम्स ऑफ इंडीया" मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी या कार्यालयाकडे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर.
६. जिल्हा परिषद, चंद्रपूर.
७. जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर.
८. उप-विभागीय कार्यालय, राजूरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर.
९. तहसिल कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
१०. पंचायत समिती कार्यालय, कोरपना, ता. कोरपना, जि. चंद्रपूर.
११. गट-ग्रामपंचायत कार्यालय नांदगाँव, ता. कोरपना, जि. चंद्रपूर
१२. गट-ग्रामपंचायत कार्यालय कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर
१३. गट-ग्रामपंचायत कार्यालय भोयेगाँव, ता. कोरपना, जि. चंद्रपूर
१४. गट-ग्रामपंचायत कार्यालय भारोसा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर

वरील अनुक्रमांक ५ ते १४ वर नमुद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्पामुळे बाधित अथवा संबंधित व्यक्तींना

त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्रकल्प स्थळ, मे. अंबुजा सिमेंट लि. नांदगांव-एकोडी लाईमस्टोन माईन, नांदगांव, ता. कोरपना, जि. चंद्रपूर निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाच्या ठिकाणी असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली होती (कार्यालयीन आदेश क्रं. ई-०४/२०२१ दि. २०/०१/२०२१-सदस्य सचिव यांचे पत्र क्रं. BO/JD(WPC)/PH/B-२१०१२०-FTS-०१३२, सहपत्र-१)

| | | |
|---|---|---|
| १) श्री. मनोहर गव्हाड,<br>अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर | - | अध्यक्ष, |
| २) श्री अशोक मा. करे,<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | - | सदस्य |
| ३) श्री. अजित पाटील,<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | - | समन्वयक |

सदर प्रकल्पाबात प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश अनुक्रमे सहपत्र-२ व ३ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. अजित पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या पध्दतीबद्दल माहीती दिली.त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक, सुचना,

विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

तद्नंतर जनसुनावणी समितीचे सदस्य श्री अजित पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी मे. अंबुजा सिमेंट लि. नांदगाँव-एकोडी लाईमस्टोन माईन, नांदगाँव, एकोडी, भोयेगाँव व कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर येथे ३६९.० हे. क्षेत्रात चुनखडी उत्खनन २.९ दशलक्ष टन प्रतिवर्ष व क्रशर १२०० टन प्रति तास उत्पादन क्षमतेच्या प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार, आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना, आक्षेप व आपल्या भावना कायद्यात नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई येथे सादर करण्याकरिता मंडळाच्या मुख्यालयात पाठविण्यात येते. ही समिती फक्त लोकांचे या प्रकल्पाबाबत मत नोंदविण्यासाठी असून, समितीला कोणताही निर्णय घेण्याचा व शिफारस करण्याचा अधिकार नाही. जनसुनावणीत उपस्थित मुद्दयांना व त्यास प्रकल्प धारकांनी दिलेले उत्तर याबद्दल अहवाल तयार करुन पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना सादर करावयाचा असतो. व त्यावर पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई पुढील निर्णय घेतात. सदर सुनावणीची छायाचित्रीकरण म.प्र.नि. मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील व त्यानंतर त्यांनी प्रकल्पधारक यांनी प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांचे प्रश्न व प्रकल्पाबाबत शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने श्री. धनंजय पु. दातीर, पर्यावरण सल्लागार यांनी सदर नियोजीत प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल खालील प्रमाणे मराठी भाषेत सादर केला. सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती

- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षांश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा, पाणी, जमिन, ध्वनी, विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पामुळे हवा, पाणी, विस्थापन, जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

१) <u>श्री. नरेश मदनराव सातपुते, कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | नांदगांव, एकोडी, भोयेगांव व कवठाळा येथील आम्ही शेतकऱ्यांनी एकमताने काही बाबींबावत चर्चा करून एक निवेदन तयार केले आहे त्याची प्रत मी आपणाकडे सादर करतो. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे कंपनीने एक सातबारा एक नौकरी या धारेणानूसार शैक्षणिक अर्हतेनूसार नौकरी द्यावी. कंपनीला शासनाकडून एकुण ३६९.५२ हे. आर जमीन घेण्याची परवानगी मिळाली आहे ती कंपनीने एकमुस्त पद्धतीने घ्यावी. कोरडवाहू जमीनीकरिता कंपनीने रू. ५० लक्ष प्रती एकर | समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आलेली आहे व आपणांस आश्वासित करतो की आपले सर्व मुद्दे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात येतील.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण मंजूरी मिळाल्यानंतर जमीन अधिग्रहणाच्या कार्यवाहीला सुरूवात होईल. |

| | | |
|---|---|---|
| | व सिंचनाखाली असलेल्या जमीनीकरिता रू. ५५ लक्ष प्रती एकर किंमत द्यावी. कंपनीने अधिग्रहीत केलेल्या जमीनीची रक्कम एकमुस्त पद्धतीने RTGS च्या माध्यमातून प्रकल्पग्रस्ताला द्यावी. जर एखाद्या प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एकही व्यक्ती नौकरी करण्यास इच्छुक नसेल तर अशा व्यक्तिंना रू ३० लक्षचे जास्तीचे आर्थिक अनुदान कंपनीने द्यावे. तसेच कंपनीने जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया ही दि. ३१/०५/२०२१ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करावी. जर कंपनी दि. ३१/०५/२०२१ पर्यंत जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया पूर्ण करू शकत नसेल तर याबाबत कंपनीने विचार करणे बंद करावे. जी काही प्रक्रिया करायची आहे ती दि. ३१-०५-२०२१ पर्यंत पूर्ण करावी. | अधिग्रहणावेळेस जमीन धारकासोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन चर्चा करून व विचार-विनिमय करून योग्य तो मोबदला देण्यात येईल या प्रक्रियेमध्ये कोणाचीही मध्यस्थता असणार नाही. प्रकल्पग्रस्त व्यक्ति व प्रकल्पधारक या दोन व्यक्तिंमध्ये करार करण्यात येईल. |

२) **श्री. नंदकिशोर पांडुरंग ठाकरे, कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पधारकाने सादर केलेल्या सादरीकरणामध्ये सन १९८६ च्या कायद्याप्रमाणे काही मुद्दे सुटलेले आहेत. कंपनी ३६९.५२ हे जमीन अधिग्रहीत करणार आहे. प्रकल्पधारकाने सांगितल्या प्रमाणे १७००० टन प्रति हेक्टर उत्पादन क्षमता असणार आहे. त्याप्रमणे प्रती एकर किंवा प्रती चौ. मी किती उत्पादन निघणार याची माहिती प्रकल्पधारकाने द्यावी. तसेच रू. ५० लक्ष प्रती हेक्टर किंमतीव्यतिरिक्त प्रकल्धारक नजीकच्या शेतकऱ्यांसाठी आणखी काय सवलती देणार याबाबत माहिती द्यावी. पर्यावरण कायद्याप्रमाणे प्रकल्पामुळे उत्खननादरम्यान उडणाऱ्या धुलीकणांमुळे शेतपिकांवर धुळीचा प्रदुर्भाव होणार त्यामुळे पिकांचे नूकसान होईल व उत्पन्नात | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण मंजूरी मिळाल्यानंतर जमीन अधिग्रहणाच्या कार्यवाहीला सुरूवात होईल. अधिग्रहणावेळेस जमीन धारकासोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन चर्चा करून व विचार-विनिमय करून योग्य तो मोबदला देण्यात येईल या प्रक्रियेमध्ये कोणाचीही मध्यस्थता असणार नाही. प्रकल्पग्रस्त व्यक्ति व प्रकल्पधारक या दोन व्यक्तिंमध्ये करार करण्यात येईल. अंबुजा सिमेंट पर्यावरणास नूकसान न होऊ देता उद्योग चालविण्याचा नेहमीच प्रयत्न असतो. तसेच उद्योगातर्फे शासनाच्या व प्रदूषण |

| | | |
|---|---|---|
| | तफावत निर्माण होण्याची शक्यता आहे. याकरिता प्रकल्पधारक काय उपाय योजना करणार आहे नूकसान भरपाई बाबत काय तरतूद केली आहे याबाबत देखील माहिती द्यावी. ब्लास्टींगमुळे ध्वनी प्रदूषण होते व नजीकच्या घरांच्या भितीला तडे जातात व त्यामुळे घर खचणे, भिंत पडणे इत्यादी प्रकार घडतात त्याकरिता प्रकल्पधारकाने काय उपाय योजना केली याबाबत देखील माहिती देण्यात यावी. खाण प्रकल्पामुळे जल प्रदूषणाची समस्या देखील निर्माण होते. एकाच साचलेल्या पाण्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होतो व आरोग्य सुविधेबाबत आपल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये काहीही नमूद केलेले नाही याबाबत प्रकल्पधारक काय उपाय योजना करणार याची माहिती देण्यात यावी. आरोग्य विषयक नुकसान झाल्यास त्याबाबतची नूकसान भरपाई सद्य:स्थितीतील वाढलेल्या महागाईप्रमाणे देण्यात यावी. | नियंत्रण मंडळाच्या अटी व शर्तीचे पालन करण्यात येते. जर प्रदूषण नियंत्रण यंत्रणेत तफावत आढळल्यास आम्ही उद्योग सुरू ठेवत नाही. तसेच प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अद्यावत करून उद्योग चालविण्यात येईल. आपणांस आश्वासित करण्यात येते की, खाण प्रकल्प सुरू करतांना हवा प्रदूषण नियंत्रणासंबंधी सर्व उपाययोजना करूनच खाणकाम सुरू करण्यात येईल जेणेकरून प्रदूषणाची समस्या उद्भवणार नाही. ब्लास्टींग प्रक्रिया खाण परिक्षेत्राच्या ३०० मी. अंतरावर करण्यात येईल जेणेकरून नजीकच्या परिसरात समस्या उद्भवणार नाही याची काळजी घेण्यात येईल. ब्लास्टींगची वेळोवेळी चाचणी केली जाईल व नियंत्रित वातावरणात ब्लास्टींग करण्यात येईल. |

३) **श्री. शंकर कवडु बोढे, एकोडी, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | श्री. नरेश सातपुते यांनी लेखी स्वरूपात उपस्थित केलेल्या मुद्यांचे उत्तर देण्यात यावे व त्यानंतरच पुढील प्रश्न घेण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण मंजूरी मिळाल्यानंतर जमीन अधिग्रहणाच्या कार्यवाहीला सुरूवात होईल. अधिग्रहणावेळेस जमीन धारकासोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन चर्चा करून व विचार-विनिमय करून योग्य तो मोबदला देण्यात येईल या प्रक्रियेमध्ये कोणाचीही मध्यस्थता असणार नाही. प्रकल्पग्रस्त व्यक्ति व प्रकल्पधारक या दोन व्यक्तिंमध्ये करार करण्यात येईल. पर्यावरण मंजूरीमध्ये प्राप्त झालेल्या अटी व शर्तींनूसार किमान ६ महिन्याच्या आत जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया सुरू केली जाईल व २ ते ३ वर्षांच्या कालावधीमध्ये जमीन अधिग्रहण प्रक्रिया |

| | | |
|---|---|---|
| | | प्रकल्पग्रस्त आणि प्रकल्पधारक यांच्या संगनमताने जमीन अधिग्रहणाची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. खाणकामादरम्यान जल प्रदूषणाची समस्या उद्भवत नाही. खाणकामादरम्यान हवा प्रदूषण होते. |

४) **श्री. वैभव मोरेश्वरराव बदखल, उप्परवाही, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | शेजारच्या उप्परवाही गावात कार्यरत असलेल्या अंबुजा सिमेंटचा प्रकल्प कार्यरत आहे. प्रकल्पधारकाचे म्हणणे आहे की या सिमेंट प्रकल्पामुळे कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होत नाही. परंतु सदर उद्योग रात्रीच्या वेळेस धुरांड्यातुन उत्सर्जन करतात ज्यामुळे परिसरातील हवा प्रदूषणात लक्षणीय वाढ झालेली आहे. प्रकल्पाच्या शेजारी असलेल्या लोकवसतीमधील घरांच्या छतावर धुळीची चादर असल्याचे आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. अंबुजा सिमेंट व माणिकगढ सिमेंट या दोन प्रकल्पाच्या मध्यभागी माझे शेत असून दोन्ही प्रकल्पांमुळे प्रदूषण होऊन माझ्या शेतीचे नूकसान होत आहे. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे याबाबत तक्रार देखील केली होती. सदर तक्रारीवर कड़क कार्यवाही अपेक्षित होती परंतु सदर तक्रारीवर कडक कार्यवाही झालेली नाही. तसेच तक्रार करून देखील सदर क्षेत्रातील परिस्थिती जैसे थेच आहे. सदर प्रस्तावित प्रकल्पाच्या शेजारी माझी शेती असून तेथे प्राण्यांचा हौदोस वाढला आहे. याबाबत उपाय योजना करण्याकरिता अंबुजा फाऊंडेशनकडे मी तक्रार दाखल केलेली आहे. तसेच माझ्या शेतीकरिता कुंपन करून देण्याची मागणी देखील केलेली आहे जेणेकरून शेतीचे नूकसान होणे टाळता येईल. तसेच वन विभागाकडुन नूकसान भरपाई मिळालेली नाही व याबाबत पाठपुरावा देखील | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणकामादरम्यान जल प्रदूषणाची समस्या उद्भवत नाही. खाणकामादरम्यान हवा प्रदूषण होते. आपणांस आश्वासित करण्यात येते की, खाण प्रकल्प सुरू करताना हवा प्रदूषण नियंत्रणासंबंधी सर्व उपाययोजना करूनच खाणकाम सुरू करण्यात येईल जेणेकरून प्रदूषणाची समस्या उद्भवणार नाही. ब्लास्टींग प्रक्रिया खाण परिक्षेत्राच्या ३०० मी. अंतरावर करण्यात येईल जेणेकरून नजीकच्या परिसरात समस्या उद्भवणार नाही याची काळजी घेण्यात येईल. ब्लास्टींगची वेळोवेळी चाचणी केली जाईल व नियंत्रित वातावरणात ब्लास्टींग करण्यात येईल. |

| | करण्यात येत नाही. | |
|---|---|---|

## ५) श्री. संजय चौधरी, नांदगांव, ता. कोरपना, जि. चंद्रपूर,

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्पधारकाने प्रस्तावित केल्याप्रमाणे अंबुजा सिमेंट कंपनी ३६९.५२ हेक्टर क्षेत्रात चुनखडीचे उत्खनन करून त्याचा वापर सिमेंट उद्योगामध्ये सिमेंट उत्पादनाकरिता करणार आहे. परंतु उर्वरित जमीनीबाबत प्रकल्पधारकाचे काय धोरण आहे याबाबत माहिती देण्यात यावी. सदर प्रस्तावित क्षेत्रात उत्खनन पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाचे विस्तारीकरण करून उर्वरित जमीन देखील अधिग्रहीत करण्यात यावी व या क्षेत्रात उत्तमोत्तम सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या व योग्य तो मोबदला देण्यात यावा. जमीनीच्या मोबदल्या व्यतिरिक्त सर्वप्रथम नौकरीचा करारनामा करण्यात यावा. तसेच या सर्व प्रक्रियेदरम्यान एका निश्चित धोरणाची अंमलबजावणी करावी जेणेकरून सर्व प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करता येईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनी ३६९.५२ हेक्टर जमिनी व्यतीरीक्त जर कोणी शेतकरी उर्वरीत जमिन विकण्यास तयार असेल तर ते दोघांच्या समन्वयाने करण्यात येईल. अंबुजा सिमेंट फाऊंडेशन भारतात नावाजलेली संस्था आहे. त्यामुळे आपणांस आश्वासित करतो की, भविष्यात अंबुजा फाऊंडेशनतर्फे योग्य त्या उपाय योजना करून या क्षेत्राचा विकास करण्यात येईल. |

## ६) श्री. अरविंद पांडुरंग ठाकरे, कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या प्रस्तावित प्रकल्पापूवी मे. रत्नागिरी सिमेंट, मे. मुरली ॲग्रो या कंपन्यांनी देखील जमीन अधिग्रहीत केलेल्या होत्या परंतु सदर जमीनी या फक्त सरकार जमा आहेत. ७/१२ वर फक्त शेतकऱ्याचा हक्क असतो परंतु जमीन अधिग्रहीत केल्यामुळे शती विकसित करायची किंवा कसे असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उद्भवला आहे. प्रकल्पधारकांना विनंती आहे की त्यांनी याबाबत लवकरात लवकर तोडगा काढावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, अंबुजा सिमेंट हा या परिसरातील कार्यरत उद्योग आहे त्यामुळे रत्नागिरी सिमेंट किंवा मुरली सिमेंटतर्फे जी टाळाटाळ करण्यात आली ती टाळाटाळ अंबुजा सिमेंटच्या प्रकल्पाबाबत होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. |

७) **श्री. महेंद्र धोंडुजी चौधरी, नांदगांव, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सर्वप्रथम प्रकल्पधारकाने येथे उपस्थित केलेल्या ७ मुद्यांबाबत माहिती द्यावी व त्यानंतर पुढील प्रक्रिया करावी व खाणकाम सुरू करावे. सदर प्रकल्प सन २०१७ पासून प्रस्तावित आहे ज्यामुळे आम्ही आमच्या शेतीच्या विकासाबाबत योग्य निर्णय घेण्यास असमर्थ झालेलो आहे. सरपंचांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा विचार करण्यात यावा व मागण्या पूर्ण करण्यात याव्या अन्यथा जमीन अधिग्रहणाचा मुद्दा सोडून द्यावा. प्रकल्पधारकाने सादर केलेले सादरीकरण हे परीकथा असल्याचे दिसते. सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रदूषणात वाढ होईल. ब्लास्टींगमुळे घराच्या भिंतींना तडे जाऊन नूकसान होईल. म्हणून कंपनीने प्रकल्पग्रस्त गावांचे पुनर्वसन करावे व येत्या 4 महिन्यात प्रकल्पाची दिशा निश्चित करावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, खाणकामादरम्यान जल प्रदूषणाची समस्या उद्भवत नाही. खाणकामादरम्यान हवा प्रदूषण होते. आपणांस आश्वासित करण्यात येते की, खाण प्रकल्प सुरू करताना हवा प्रदूषण नियंत्रणासंबंधी सर्व उपाययोजना करूनच खाणकाम सुरू करण्यात येईल जेणेकरून प्रदूषणाची समस्या उद्भवणार नाही. ब्लास्टींग प्रक्रिया खाण अधिकनियमानुसार करण्यात येईल. जेणेकरून नजीकच्या परिसरात समस्या उद्भवणार नाही याची काळजी घेण्यात येईल. ब्लास्टींगची वेळोवेळी चाचणी केली जाईल व नियंत्रित वातावरणात ब्लास्टींग करण्यात येईल. |

८) **श्री. राजेश वा. बेले, संस्थापकीय अध्यक्ष, संजीवनी पर्यावरण सामाजिक संस्था, ता. जि. चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सदर प्रस्तावित प्रकल्पामुळे जल व वायु प्रदूषण होऊन आरोग्याच्या समस्या जसे की श्वसनाचे आजार व क्षय रोग यासारख्या अनेक समस्या निर्माण होणार आहेत. याकरिता या परिसरामध्ये अंबुजा सिमेंटने अद्यावत सोई-सुविधा उपलब्ध करून एक मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल कार्यान्वित करावा जेणेकरून येथील नागरीकांना आरोग्य विषयक उत्तम उपचार देणे शक्य होईल. तसेच शेतकऱ्यांच्या होणाऱ्या नूकसान भरपाईबाबत देखील योग्य धोरण तयार करून CSR निधीमध्ये तरतूद करावी. अंबुजा सिमेंट सारख्या मोठ्या कंपन्या या क्षेत्रात असून देखील येथे विकास आजपावेतो झालेला नाही. जल | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, उप्परवाही येथे अंबुजा सिमेंटचा १० खाटांचा दवाखाना उपलब्ध आहे. या क्षेत्रातील सर्व प्रकारच्या कामगारांचा व नागरीकांच्या मोफत उपचाराची सुविधा तेथे उपलब्ध करून देण्यात येईल. या परिसरात भविष्यात गरजेनूसार मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल उपलब्ध करून देण्याची योजना करण्यात येईल. मागील ५ वर्षांमध्ये CSR निधीच्या माध्यमाद्वारे पाणी पुरवठा, शेतीच्या विकासासंबंधी, आरोग्य विषयक, महिला सशक्तीकरण, कौशल्य विकास |

| | | |
|---|---|---|
| | प्रदूषण नियंत्रण कायदा, १९७४ व हवा प्रदूषण नियंत्रण कायदस, १९८१ नूसार नूकसान भरपाई करण्यात येत नाही. चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक कंपनी प्रदूषण करते व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पाहणी करून फक्त कारणे दाखवा नोटीसीची कार्यवाही करते. चंद्रपूर जिल्ह्यातील प्रदूषण कमी करण्याकरिता ठोस उपाय योजना करणे बंधनकारक झालेले आहे परंतु तसे होताना निदर्शनास येत नाही. | योजनेअंतर्गत व शिक्षणावर एकूण रू. १३८८ लक्ष खर्च करण्यात आले आहेत. या पूर्वी या परिसरात मोबाईल दवाखाना सुरू होता. तो बंद करण्यात आला असून त्याठिकाणी सामुदायिक दवाखाना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तेथे आठवड्यातून एक दिवस प्रत्येक गावातील नागरीकांना सेवा प्रदान करतात. |

९) **श्री. स्वप्निल रविंद्र ठाकरे, कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पधारकांनी आजपर्यंत शेतकऱ्यांची परवानगी न घेता या क्षेत्राचे सर्वेक्षण केले. प्रकल्पधारकांना विनंती आहे की यापुढे परिसरातील शेतकऱ्यांची परवानगी न घेता या क्षेत्राचे सर्वेक्षण करू नये. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. आम्ही विना शेतकऱ्याच्या परवानगी शिवाय सर्वे केलेला नाही व भविष्यात सुध्दा तुमच्या परवानगीने सर्वेक्षणाचे कार्य करु. |
| २) | प्रकल्पधारकांनी स्थानिकांना शैक्षणिक अर्हतेनूसार कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून द्यावा. कंत्राटी पद्धतीचा रोजगार उपलब्ध करून देण्यात येऊ नये. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, कंपनीच्या गरजेनुसार व शैक्षणिक अर्हतेनूसारच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. |

१०) **श्री. पुरूशोत्तम गावंडे, भोयेगांव, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पानजीकच्या काही शेतजमीनी राज्य महामार्गालगत आहेत. अशा शेतजमीनींचे अधिग्रहण करताना बाजारभावानूसार प्रकल्पग्रस्त व्यक्तिंना मोबदला देण्यात यावा. आजच्या काळात या जमीनींची किंमत ही कमीत कमी रू. ३० लक्ष प्रती एकर प्रमाणे आहे. याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना दुप्पटीने मोबदला देण्यात यावा. भोयेगांव, नांदगाव, एकोडी व | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण मंजूरी मिळाल्यानंतर जमीन अधिग्रहणाच्या कार्यवाहीला सुरूवात होईल. अधिग्रहणावेळेस जमीन धारकासोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन चर्चा करून व विचार-विनिमय करून योग्य तो |

| | | |
|---|---|---|
| | कवठाळा या गावांमध्ये प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. परंतु याबाबत म.प्र.नि. मंडळ, जिल्हाधिकारी कार्यालय किंवा तहसिल कार्यालयातर्फे कोणत्याही प्रकारची नूकसान भरपाई देण्यात आलेली नाही. प्रकल्पधारकांने या गावात पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच शैक्षणिक अर्हतेनूसार प्रकल्पधारकांनी प्रकल्पग्रस्त व्यक्तिंना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून द्यावा. | मोबदला देण्यात येईल. प्रकल्पग्रस्त व्यक्ति व प्रकल्पधारक या दोन व्यक्तिंमध्ये करार करण्यात येईल. अंबुजा सिमेंट फाऊंडेशन भारतात नावाजलेली संस्था आहे. त्यामुळे आपणांस आश्वासित करतो की, भविष्यात अंबुजा फाऊंडेशनतर्फे योग्य त्या उपाय योजना करून या क्षेत्राचा विकास करण्यात येईल. तसेच शैक्षणिक अर्हतेनूसारच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. |

११) **<u>श्री. मोहन धांडे, जैतापूर, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझे गांव नांदगाव गावापासून ५ कि.मी. अंतरावर आहे. आमच्या जमीनी अधिग्रहीत करताना किती मोबदला देण्यात येईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. पर्यावरण मंजूरी मिळाल्यानंतर जमीन अधिग्रहणाच्या कार्यवाहीला सुरूवात होईल. अधिग्रहणावेळेस जमीन धारकासोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन चर्चा करून व विचार-विनिमय करून योग्य तो मोबदला देण्यात येईल. प्रकल्पग्रस्त व्यक्ति व प्रकल्पधारक या दोन व्यक्तिंमध्ये करार करण्यात येईल. |

१२) **<u>श्री. नंदकिशोर पाचभाई, भोयेगांव, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पधारकाने जमीनीबाबत दिलेल्या दराबाबत सर्व शेतकऱ्यांची सहमती आहे. प्रकल्पधारकाने शैक्षणिक अर्हतेनूसार कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून द्यावा. प्रकल्पधारकाने भूमीहीन प्रकल्पग्रस्त व्यक्तिंना अधिक नूकसान भरपाई देण्याबाबत कोणती तरतूद केलेली आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण मंजूरी मिळाल्यानंतर जमीन अधिग्रहणाच्या कार्यवाहीला सुरूवात होईल. अधिग्रहणावेळेस जमीन धारकासोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन चर्चा करून व विचार-विनिमय करून योग्य तो मोबदला देण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | येईल. प्रकल्पग्रस्त व्यक्ति व प्रकल्पधारक या दोन व्यक्तिंमध्ये करार करण्यात येईल. |

१३) **श्री. भारत गोसाई निब्रड, कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ट्रांस्पोर्ट नगर येथे वाहनांच्या वर्दळीमुळे मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत. त्याकरिता प्रकल्पधारकाने कोणत्या प्रकारची उपाय योजना केलेली आहे. सर्वप्रथम ट्रांस्पोर्ट नगर येथील समस्यांवर तोडगा काढण्यात यावा व त्यानंतर प्रस्तावित प्रकल्प कार्यान्वित करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. २५० गाड्यांची पार्किंग व्यवस्था अमच्या पार्किंग यार्ड मध्ये केलेली आहे. ज्या गाड्या रोडच्या बाजुला उभ्या असतात त्या आमच्या नसून हॉटेल आणि पंकचर दुरुस्तीसाठी उभ्या असतात. पार्किंग यार्ड वाढविण्यासाठी आम्ही तरतूद केलेली आहे. |

१४) **श्री. नामदेव भिकाजी बोढे, एकोडी, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महाराष्ट्र शासनाने सुमारे ३ कोटी वृक्ष लागवड केल्याचे सांगण्यात आले परंतु प्रत्यक्षात ते निदर्शनास येत नाही. प्रकल्पधारकाने कमीत कमी २००० ते ३००० झाडे लावावी त्यात खाण क्षेत्राच्या काठावर फळझाडेलावावीत. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. MoEF च्या मार्गदर्शक तत्वानुसार झाडांची प्रजाती व प्रती हेक्टर संख्या ठरविलेली जाते, तरी देखील आम्ही CSR च्या माध्यमातून हा प्रभाग विकसीत करु. |

१५) **श्री. राहुल रविंद्र ठाकरे, कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ज्या ठिकाणी नविन प्रकल्प कार्यान्वित होतो तेथे सामाजिक आर्थिक व भैगोलिक बदल होतात. मे. अंबुजा सिमेंट यांना सदर जमीन इ-लिलावाद्वारे सन २०१६ मध्ये प्राप्त झाली आहे. येथील शेतकरी त्यांच्या मुलांना सांगतात की आपली शेतजमीन प्रकल्पाकरिता अधिग्रहीत होणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांची मुले उच्च | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण मंजूरी मिळाल्यानंतर जमीन अधिग्रहणाच्या कार्यवाहीला सुरूवात होईल. अधिग्रहणावेळेस जमीन धारकासोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन चर्चा |

| | | |
|---|---|---|
| | शिक्षणकरिता प्रयत्न करत नाहीत. जमीन अधिग्रहीत होणार असल्याने शेतकरी शेतीच्या विकासाकरिता काही करू शकत नाही. जमीन अधिग्रहण कायदा, २०१३ हा शेतकऱ्यांच्या हिताचा आहे. सन २०१५ मधील जमीन अधिग्रहण कायदा हा शेतकऱ्यांच्या हिताचा नाही. त्यामुळे जर जमीन अधिग्रहणात विलंब झाला व सन २०१५ चा कायदा जो सध्या राज्यसभेच्या मंजूरीकरिता प्रस्तावित आहे अंमलात आला तर यात शेतकऱ्यांचेच नूकसान होणार आहे. | करून व विचार-विनिमय करून योग्य तो मोबदला देण्यात येईल. प्रकल्पग्रस्त व्यक्ति व प्रकल्पधारक या दोन व्यक्तिंमध्ये करार करण्यात येईल. अंबुजा सिमेंट फाऊंडेशन भारतात नावाजलेली संस्था आहे. त्यामुळे आपणांस आश्वासित करतो की, भविष्यात अंबुजा फाऊंडेशनतर्फे योग्य त्या उपाय योजना करून या क्षेत्राचा विकास करण्यात येईल. कंपनीच्या गरजेनुसार व शैक्षणिक अर्हतेनूसारच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. |

१६) **<u>श्री. विजय नामदेव ठाकरे, कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | एखाद्या गावाची ७० टक्के जमीन प्रकल्पात अधिग्रहीत केल्यास त्या गावाला प्रकल्पधारक दत्तक घेतात व त्या गावाचे पुनर्वसन करण्यात येते. कंपनीने त्यांचे उद्दिष्ट कधीही बोलून दाखवलेला नाही. कंपनीने जमीन अधिग्रहीत केल्यानंतर एमआयडीसी ॲक्ट लागू होते. त्यामुळे जमीनीवर विहीर खोदता येत नाही तसेच कोणत्याही प्रकारचे सिंचन करता येत नाही. वीज पुरवठा देखील करता येत नाही व जमीन अधिग्रहीत केल्यानंतर जमीनीतून काही उत्पन्न घेण्याची आमची तशी मानसिकता राहात नाही. तसेच जमीन अधिग्रहीत केल्यानंतर प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार रोजगार उपलब्ध करून देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण मंजूरी मिळाल्यानंतर जमीन अधिग्रहणाच्या कार्यवाहीला सुरूवात होईल. अधिग्रहणावेळेस जमीन धारकासोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन चर्चा करून व विचार-विनिमय करून योग्य तो मोबदला देण्यात येईल. प्रकल्पग्रस्त व्यक्ति व प्रकल्पधारक या दोन व्यक्तिंमध्ये करार करण्यात येईल. अंबुजा सिमेंट फाऊंडेशन भारतात नावाजलेली संस्था आहे. त्यामुळे आपणांस आश्वासित करतो की, भविष्यात अंबुजा फाऊंडेशनतर्फे योग्य त्या उपाय योजना करून या क्षेत्राचा विकास करण्यात येईल. कंपनीच्या गरजेनुसार व शैक्षणिक अर्हतेनूसारच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. |

१७) श्री. राजेंद्र मनोहर ठाकरे, कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सादरीकरणादरम्यान सांगितल्याप्रमाणे प्रत्यक्षात सर्व उपाययोजनांची अंमलबजावणी होणार किंवा कसे याबाबत शंका निर्माण होत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्यांची उपस्थिती दर्शवून प्रदूषण नियंत्रणाबाबत प्रकल्पधारकांना आदेश द्यावेत जेणेकरून परिसरातील प्रदूषण कमी होणे शक्य होईल. जमीनीची किंमत रू. ५० लक्ष प्रती एकरच देण्यात यावी. सरपंच, कवठाळा ग्रामपंचायत यांनी दिलेल्या निवेदनाशी मी सहमत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, पर्यावरण मंजूरी मिळाल्यानंतर जमीन अधिग्रहणाच्या कार्यवाहीला सुरूवात होईल. अधिग्रहणावेळेस जमीन धारकासोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन चर्चा करून व विचार-विनिमय करून योग्य तो मोबदला देण्यात येईल. प्रकल्पग्रस्त व्यक्ति व प्रकल्पधारक या दोन व्यक्तिंमध्ये करार करण्यात येईल. अंबुजा सिमेंट फाऊंडेशन भारतात नावाजलेली संस्था आहे. त्यामुळे आपणांस आश्वासित करतो की, भविष्यात अंबुजा फाऊंडेशनतर्फे योग्य त्या उपाय योजना करून या क्षेत्राचा विकास करण्यात येईल. कंपनीच्या गरजेनुसार व शैक्षणिक अर्हतेनूसारच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. |

१८) <u>श्री. रविंद्र ठाकरे, कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-</u>

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी एकूण २४ एकर जमीन आहे. त्यपैकी मराठा सिमेंट १७ एकर जमीन अधिग्रहीत करणार आहे. त्यामुळे उर्वरित जमीनीचे भविष्यात प्रदूषणामुळे नूकसान होणार आहे. कंपनीला विनंती आहे की त्यांनी उर्वरित जमीन देखील अधिग्रहीत करावी व त्याचा मोबदला प्रती एकर किती देणार आहेत याबाबत माहिती द्यावी. तसेच खाणपट्टा तयार | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | झाल्यानंतर सीमेवर कुंपन लावण्यात येईल त्यामुळे शेतीमध्ये ये-जा करायला दुसरा रस्ता तयार करून देण्यात यावा. | |

१९) **श्री. शंकर कवडु बोढे, कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | खनिज वाहतूकीसाठी कोणत्या रस्त्याचा वापर करण्यात येणार आहे. अस्तित्वात असलेल्या रस्त्याचा खनिज वाहतूकीकरिता वापर केल्यास सदर रस्ता अधिभार वाहतूकीमुळे खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतीच्या सभोवताली तारांच्या कुंपनाची व्यवस्था CSR निधीचा वापर करून देण्यात यावी जेणेकरून शेतपिकांचे जंगली जनावरांमुळे नूकसान होणार नाही. शेतकऱ्यांचे शेतीतून उत्पन्न वाढविण्यासाठी कंपनीने फळझाडे उपलब्ध करून द्यावी. श्री. नरेश सातपुते यांनी सादर केलेल्या निवेदनाचे समाधान करण्यात यावे. सन २०१७ पासून आमची शेती पडीत असून आमचा मानसिक छळ होत आहे. खूप कमी लोकांना याचा फायदा होत आहे. अंबुजा सिमेंट कंपनी आमच्या जमीनी खरेदी करताना अडचण निर्माण होऊ नये म्हणून कार्य करत आहेत. या क्षेत्रात एकूण ४ सिमेंट उद्योग असून देखील आमच्या गावाचा आजपावेतो विकास झालेला नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, सदर प्रश्नाची नोंद घेण्यात आलेली आहे. मागील ५ वर्षांमध्ये CSR निधीच्या माध्यमाद्वारे पाणी पुरवठा, शेतीच्या विकासासंबंधी, आरोग्य विषयक, महिला सशक्तीकरण, कौशल्य विकास योजनेअंतर्गत व शिक्षणावर एकूण रू. १३८८ लक्ष खर्च करण्यात आले आहेत. या पूर्वी या परिसरात मोबाईल दवाखाना सुरू होता. तो बंद करण्यात आला असून त्याठिकाणी सामुदायिक दवाखाना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तेथे आठवड्यातून एक दिवस प्रत्येक गावातील नागरीकांना सेवा प्रदान करतात. MoEF च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार झाडांची प्रजाती व प्रती हेक्टर संख्या ठरविलेली जाते, तरी देखील आम्ही CSR च्या माध्यमातून हा शेतकऱ्यांना फळझाडे वितरीत करु. |

२०) **डॉ. रितेश अरविंद ठाकरे, कवठाळा, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जमीन अधिग्रहीत करताना योग्य मोबदला | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, |

| | | |
|---|---|---|
| | देण्यात यावा. एका ७/१२ वर एका व्यक्तिलाच नौकरी देण्यात यावी. उपरोक्त बाबींबाबत कंपनीने लेखी आश्वासन द्यावे. गुजरात येथील अंबुजानगर येथे सुसज्जित दवाखाना उपलब्ध केलेला आहे त्याचप्रमाणे या क्षेत्रातात देखील सुसज्जित दवाखाना उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच अंबुजा सिमेंट येथील शाळेत सर्व विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देण्यात यावा. सर्व प्रकल्पग्रस्तांना मोबदल्याची एकमुस्त रक्कम ऑनलाईन प्रणालीद्वारेच देण्यात यावी. मासिक हप्ते देण्यात येऊ नये. जमीन अधिग्रहीत झाल्यानंतर लगेच खाणकामाला सुरूवात करण्यात यावी. आजपावेतो पिंपळगाव येथील रहिवाशांना रोजगार प्राप्त झालेला नाही. पिंपळगांव येथील प्रकल्पग्रस्तांना रोजगार कधी उपलब्ध होईल याबाबत देखील माहिती देण्यात यावी. | पर्यावरण मंजूरी मिळाल्यानंतर जमीन अधिग्रहणाच्या कार्यवाहीला सुरूवात होईल. अधिग्रहणावेळेस जमीन धारकासोबत प्रत्यक्ष बैठक घेऊन चर्चा करून व विचार-विनिमय करून योग्य तो मोबदला देण्यात येईल. प्रकल्पग्रस्त व्यक्ति व प्रकल्पधारक या दोन व्यक्तिंमध्ये करार करण्यात येईल. कंपनीच्या गरजेनुसार व शैक्षणिक अर्हतेनूसारच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल.<br>आमच्या सुरु असलेल्या प्लांटमध्ये ८० टक्के स्थानिक लोकांना रोजगार दिलेला आहे. |

२१) **श्री. वाय. चन्नकेश्वर रेड्डी, सामाजिक कार्यकर्ता, हैदराबाद:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पधारकाने सन २०१३ च्या कायद्यानुसार प्रकल्पग्रस्तांना मोबदला द्यावा. प्रकल्पग्रस्तांसाठी पुनर्वसन पॅकेज जाहीर करण्यात यावा. प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी रोजगार देण्यात यावा व परप्रांतीय व्यक्तिंना कंत्राटी पद्धतीचा रोजगार देण्यात यावा. शेती करणाऱ्या व्यक्तिंना कोणत्याही प्रकारच्या समस्या निर्माण होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. रोजगारात स्थानिकांना जास्त प्राधान्य देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, शैक्षणिक अर्हतेनूसारच रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल. |

२२) श्री. मनोहर गव्हाड, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न |
|---|---|
| १) | पर्यावरण विषयक जनसुनावणी कार्यपद्धत पुढील प्रमाणे आहे. जनसुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नांना प्रकल्पधारक उत्तर देऊन प्रकल्पग्रस्तांचे समाधान करतात. जनसुनाणी समिती जनसुनावणी दरम्यान उपस्थित केलेल्या प्रश्नांची नोंद घेऊन इतिवृत्त तयार करून पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली किंवा पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करते. कोणत्याही प्रकल्पास मान्यता तत्सम शासकीय विभाग देतात. प्रकल्पास मिळाल्यानंतर जमीन अधिग्रहण व प्रकल्प सुरू करणे इत्यादी प्रक्रिया सुरू करण्यात येते. |

२३) सौ. सीमा दुरटकर, उप्परवाही, ता. कोरपना, जि. चंद्रपूर:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न |
|---|---|
| १) | अंबुजा सिमेंट कंपनीतर्फे CSR अंतर्गत चांगले काम करण्यात येत आहे. त्यांच्यातर्फे गावातील महिलांकरिता महिला बचत गट स्थापन करण्यात आला आहे. त्या माध्यमातून गावातील आरोग्य विषयक उपाय योजना करण्यात येत आहेत. |

२४) श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न |
|---|---|
| १) | माझा या प्रस्तावित प्रकल्पास पाठींबा आहे व मी माझे निवेदन म.प्र.नि. मंडळाकडे लिखीत स्वरूपात सादर केलेला आहे. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यातआलेल्यासूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डींग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिलामाळा, उद्योगभवन, रेल्वेस्टेशनरोड, चंद्रपूर येथे थोड्या दिवसात उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| (अजित पाटील)<br>समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | (अ. मा. करे)<br>सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | (मनोहर [illegible])<br>अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर |